सत्यमेव जयते

# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद जिल्हा Sangli

# लेखा परीक्षण अहवाल

# 2021-2022

सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय, सांगली
जिल्हा परीषद, प्रशासकीय इमारत, मिरज रोड

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद यांनी 2021-2022 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , जिल्हा परिषद सांगली
लेखापरिक्षण अहवाल सन २०२१-२०२२

---

जा.क्र./स्था/ब जिप/ग्रापापु/ले.प./२०२१-२०२२ सांगली – 739

सहसंचालक
स्थानिक निधी लेखा परिक्षा
लेखाकोष भवन , ३रा मजला
जिल्हा धिकारी कार्यालय आवार
पुणे
दिनांक :- 11/08/२०२३

**प्रेषक,**
**सहसंचालक,**
**स्थानिक निधी लेखापरिक्षा**
**पुणे विभाग पुणे**

**प्रति,**

मा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सांगली

ग्रामिण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली यांचे सन २०२१- २०२२ आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण श्री.विकास खोळपे सहाय्यक संचालक, श्री.सं.वि.नवले सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी, श्री.सु.ना.खांडेकर, वरिष्ठ लेखापरिक्षक , श्री.पवन चलवादी कनिष्ठ लेखापरिक्षक, श्री.मोहन माने कनिष्ठ लेखापरिक्षक स्थानिक निधी लेखा परिक्षा सांगली यांचे पथकाने दिनांक १०/०४/२०२३ ते २५/०४/२०२३ अखेर केले असून श्री.ग.बा.पाटील सहसंचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण पुणे विभाग पुणे यांनी दिनांक 24/05/२०२३ रोजी यांनी चर्चा करुन अंतिमीकरण केले

**लेखापरिक्षण कालावधीत खालील अधिकारी कार्यरत होते.**

| अ.क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | सौ.प्राजक्ता नंदकुमार कोरे | अध्यक्ष | ०१/०४/२०२१ ते २०/०३/२०२२ |
| २ | श्री.जितेंद्र डुडी | प्रशासक | २१/०३/२०२२ ते ३१/०३/२०२२ |
| १ | श्री.जितेंद्र डुडी | मुख्य कार्यकारी अधिकारी | ०१/०४/२०२१ ते ३१/०३/२०२२ |
| २ | श्री.दादासो सोनावणे | कार्यकारी अभियंता (प्र.) | ०१/०४/२०२१ ते १६/०८/२०२१ |
| ३ | श्री.एस.एम.कदम | कार्यकारी अभियंता | १७/०८/२०२१ ते ३१/०३/२०२२ |

**सहसंचालक,**
**स्थानिक निधी लेखापरिक्षा**
**पुणे**

कार्यकारी अभियंता
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद सांगली

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 1

**I PART I :मागील लेखा परीक्षण अहवाल ........ 2**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद ........ 2

**PART II ........ 7**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद ........ 7

**कलम ९ अ खालील आक्षेप ........ 8**

1 अंदाजपत्रक कमी जादा खर्चाबाबत. ........ 9

2 शासकीय अनुदान निर्धारणाबाबत. ........ 10

**कलम ९ ब खालील आक्षेप ........ 12**

3 प्रलंबित तसलमात रकमेबाबत. ........ 13

4 मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे आरळा ता.शिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे. ........ 14

5 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची थकीत पाणीपट्टीबाबत. ........ 16

6 मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत म्हैसाळ ता.मिरज येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे. ........ 17

7 हातपंप,विद्युतपंप देखभाल व दुरुस्ती वर्गणी थकबाकीबाबत. ........ 20

8 आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत साखराळे ता. वाळवा पाईपलाईन व टाकी बांधणे. ........ 20

9 मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे रिळे ता.शिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे. ........ 23

10 जलजीवन मिशन बैठक चहापाणी खर्चाबाबत ........ 25

**कलम ९ क खालील आक्षेप ........ 27**

**-------------------- निरंक ------------------- ........ 28**

**कलम ९ ड खालील आक्षेप ........ 30**

11 अभिकरण शुल्क वसुलीबाबत ........ 31

12 स्थावर/जंगम मालमत्ता नोंदवहीबाबत. ........ 31

13 प्रलबित परिच्छेदांचे अनुपालनाबाबत. ........ 32

14 लेखापरीक्षण अहवाल संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत. ........ 32

15 वेतन व भत्ते बाबतचे एस.एल.ओ. रजिस्टर न ठेवलेबाबत. ........ 33

16 ई – निविदा प्रणाली द्वारे मागविनेत आलेल्या निविदांचे निविदा शुल्क व बयाना रक्कम जिल्हा परिषद निधी मध्ये जमा करणेबाबत. ........ 33

17 महापूर बाधित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना – तुंग-बागणी-क. डिग्रज जकवेल येथील 75 अ. श. व 65 अ. श. व्हि. एच. एस. स्टार्टर , ए. पी. एफ. सी. पनेल दुरुस्ती खर्च बाबत. ....... 34

18 महापूर बाधित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना – कुंडल घोगाव जकवेल येथील 315 KVR ट्रान्सफार्मर दुरुस्ती खर्च बाबत. 35

19 महापूर बाधित प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना – कुंडल घोगाव जकवेल येथील 200 अ श व्ही.एस. मोटर, मेन पॅनल / स्टार्टर, ए पी एफ पॅनल दुरुस्ती खर्च बाबत. ....... 37

20 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना – कुंडल येथील पंप हाउस येथील 35 एच पी व्ही टी पंप सेट दुरुस्त करणे....... 38

21 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना – कासेगाव येवलेवाडी पंप हाउस येथील 60 अ श व्ही टी पंप सेट नं 1 व सेट नं 2 ची व्ही एस एस मोटर दुरुस्ती करणे खर्च बाबत. ....... 39

22 जिल्हा वार्षिक योजनेतून नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत 8 गावामध्ये वॉटर एटीएम बसविणेबाबत ....... 40

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र....... 45

**विवरणपत्रे व जोडपत्रे ....... 46**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | 1, 2 | 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10 | | 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22 |

## I Part I :मागील लेखा परीक्षण अहवाल

***ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद***

भाग एक मागील लेखापरिक्षण

(प्रलंबित परिच्छेदबाबत)

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील परिच्छेद प्रलंबित असून त्या बाबत मा .आयुक्त , पुणे विभाग , पुणे यांचेकडे स्वतंत्र पत्रव्यवहार सुरू आहे .

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग लेखापरीक्षण सन 202 1-22

| अ.क्र | ले.प.वर्ष | प्रलंबित परिच्छेद क्रमांक | | एकूण | पं.रा.स पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक/ संकेतांक क्रमांक | पं.रा.स. पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वनिधी | शासन निधी | | | |
| 1 | 2000-01 | 18,19,20, 31,32,36, 37,39,40, 41,45,46, 47, 50 | 4,6,7,8,9,10,12, 13,14,15,16,21, 23,26,28,29,30, 33,34,35,43,44, 48,49,51,52,57 | 41 | - | - |
| 2 | 2001-02 | 5,47,66, 68,70,71, 73,74,75, 76 | 4,6,7,8,9,10,11, 12,13,14,15,16, 17,20,21,22,23, 25,26,27,28,29, 30,31,35,36, 38, 39,41,42,44, 48, 49,51,52,53, 55, 57,58,59, 60, 63,64,65,77, 78, 79 | 58 | - | - |
| 3 | 2002-03 | - | 3,4,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16, 17,18,19,20,24, 27,28,29,30, 31, 34,37,38,39, 40, 41,42,43,44, 46, 48,49, 50,54, 55, 56, 58, 59,61, 62, 66,67 | 45 | - | - |
| 5 | 2004-05 | 3 | 4,5,7,8,9,10,11, 12,13,16,17,18, 19,24,26,27,29, 30, 31,32,34,35, 36,37,39,41,43, 45,47, 48, 49, 52, 54,55, 57, | 43 | 72(पं.रा.स)3.587 | लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणेबाबत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 59,61,62,66,67, 69,72 | | | |
| 6 | 2005-06 | 8 | 3,4,5,7,9,12,19, 21, 22,24, 25, 26,28,29,30,31, 33,34,38, 41, 44, 45, 46, 47, 49, 51,52, 53, 54, 56, 57,58 | 33 | 4(पं.रा.स)3.586 | तुरटी खरेदीमधील अनियमितता |
| 7 | 2006-07 | - | 3,4,14,17,18,20, 23,29,43,49, 53,54 | 12 | 3(पं.रा.स) | |
| | | | | | 4(पं.रा.स)4.1 | अखर्चित रक्कम शासनास परत न करणे बाबत |
| | | | | | 14(पं.रा.स) 3.27 3 | सार्वजनिक विहीर व नळ पाणीपुरवठा योजनेतील अनियमितता |
| | | | | | 17(पं.रा.स) 3.27 3 | सार्वजनिक विहीर व नळ पाणीपुरवठा योजनेतील अनियमितता |
| | | | | | 22(पं.रा.स) 3.27 5 | ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील आस्थापना |
| | | | | | 29(पं.रा.स) | |
| | | | | | 43(पं.रा.स)4.7 | अपूर्ण नोंदवह्या व नोंदवह्या सादर न केले बाबत |
| | | | | | 53(पं.रा.स)4.5 | जिल्हा परिषद व पंचायत समितीने लेखापरीक्षणासाठ ी अभिलेखे सादर न केलेबाबत |
| | | | | | 54(पं.रा.स)4.4 | जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील अपूर्ण कामांबाबत |
| 8 | 2007-08 | 23,26,29 | 1,2,3,5,7,9, 12,18,19,21, 24,25,27,31,32, 33, 38,39,41 | 22 | 9(पं.रा.स)3.426 | देखभाल दुरुस्ती प्रोत्साहनपर अनुदान खर्चाबाबत |
| 9 | 2008-09 | 3,4,5,6,7, 10,17, 18, 20, 22, 23 | 1,2,8,12,19, 21,25,27,31, 33, 34,36,37,39, 41 | 26 | 4(पं.रा.स)3.502 | तुरटी खरेदीबाबत |
| | | | | | 33(पं.रा.स)3.506 | पाणी टंचाई निवारनार्थ पाणी पुरवठा |
| 10 | 2009-10 | 3,4,7,12, 21,31, 38 | 1, 5, 11,14,16, 18,19,20,22, 25, 27,30,32,35, 36, 37 | 23 | 20(पं.रा.स)3.514 | अधिगृहित विंधन विहिरी/ इंजिन भाडे आदा |
| 11 | 2010-11 | 13 | 1,3,4,7,8,10, | 26 | 3(पं.रा.स)3.45 | नियमबाह्य |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 11,14,15,16,17, 18,19,20,21,22, 23,27,28, 29, 31,32,33,34,35 | | | प्रक्रीयेद्वारे इलेक्ट्रोक्लोरी नेटर सयंत्रे खरेदीबाबत |
| | | | | | 16(पं.रा.स)3.447 | व्हनमाने वस्ती करगणी येथे 5000 ली. क्षमतेची टाकी बांधणे |
| | | | | | 19(पं.रा.स)3.448 | टी.सी.एल खरेदी बाबत |
| 12 | 2011-12 | 17 | 1,5,6,7,8,9,10,11,12,13,15,16,18, 19,20,21,22, 23,24,25,27,28, 29,30,31,32 | 27 | | |
| 13 | 2012-13 | 3,4,5,7,8 | 12,14,15,17,19, 20,21,23,24,25, 26,27,30,31,32, 33, 34,35,36,38, 40,41,42,44, 46, 47, 48,49,50, 51,52, 53,54, 55, 56,57, 58,59, 60, 62, 63,64,65, 66, 67, 68,69,70,71 | 54 | 36(पं.रा.स) 3.525 | मौजे नेवरी तालुका कडेगाव येथे नळ पाणी पुरवठा करणेबाबत |
| | | | | | 44(पं.रा.स) 3.528 | मौजे आमणापूर ता-कडेगाव देशमुख वस्तीसाठी भारत निर्माण अंतर्गत पाणी पुरवठा योजना |
| 14 | 2013-14 | 1,2,7,8,13 | 3,4,5,6, 9,10,12, 14,15,16,17,18, 19,20,21,22,23, 24,25,26,27,28, 29,30,31,32,33, 34,35,36,37 | 36 | 1(पं.रा.स) 3.672 | संगणक व प्रिंटर खरेदीबाबत |
| | | | | | 4(पं.रा.स) 3.673 | विंधन विहीर खर्चाबाबत |
| | | | | | 9(पं.रा.स) 3.674 | पॉवर फॅक्टर दंडाच्या रक्कमा अदा केल्याने झालेल्या नुकसानी बाबत |
| | | | | | 14(पं.रा.स) 3.675 | कसबे डिग्रज तालुका मिरज येथील पाण्याने भरलेल्या खाणी मधील अतिरिक्त पाण्याचा निचरा करणेसाठी जल:निसारण योजने करणेबाबत |
| | | | | | 21(पं.रा.स) 3.676 | हातपंप सुटे भाग खरेदी बाबत |
| 15 | 2014-15 | 6,16,17,22 | 1,2,3,4,5,7,8,9,10, 11,12,13,14,15, 18,19,20,21,23, 24,25,26,27,28, 29,30 | 30 | 7(पं.रा.स)3.468 | पाणी पुरवठा खर्चातील अनियमितता |
| | | | | | 15(पं.रा.स)3.469 | हातपंप/वीजपंप थकीत वर्गणीबाबत |
| | | | | | 18(पं.रा.स)3.470 | हातपंप/सुटेभाग खरेदी बाबत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 16 | 2015-16 | 12 | 1,2,3,4,5,6,7,8, 9, 10,11,13, 14,15, 16,17, 18,19, 20, 21, 22, 23,24, 25, 26, 27,28, 29, 30,31,32 | 32 | 5(पं.रा.स) 3.457 | मौजे किल्ले मच्छिंद्रगड नळ पाणीपुरवठा करणे |
| | | | | | 10(पं.रा.स) 3.458 | मौजे डोंगरवाडी ता. वाळवा नळ पाणी पुरवठा योजनेबाबत |
| | | | | | 25(पं.रा.स) 3.1024 | ठेव नोंदवही न ठेवणे बाबत |
| | | | | | 31(पं.रा.स) 3.1024 | तसलमात नोंदवहीबाबत |
| 17 | 2016-17 | 5, 13, 14, 22 | 1, 2, 3, 4, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 23, 24, 25, 26 | 26 | 4(पं.रा.स) (3.504) | टीसीएल /ब्लिचिंग पावडर बाबत |
| | | | | | 10 (पं.रा.स) (3.505) | भूजल सर्वेक्षणासाठी ब्लास्टिंग वाहने लावणेसाठी व कार्यशाळेसाठी जागा भाड्याने घेतलेबाबत |
| | | | | | 11 (पं.रा.स) (3.506) | पाणी पुरवठा योजना खर्चातील अनियमिततेबाबत |
| | | | | | 14(पं.रा.स) (3.1033) | तसलमात नोंदवहीबाबत |
| 18 | 2017-18 | 1, 2, 4, 5, 6, 8, 10, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 30, 31, | 3, 7, 9, 11, 12, 27, 28, 29, 32, 33 | 33 | 6 (पं.रा.स) 3.372 | अपुर्ण कामाबाबत |
| | | | | | 7 (पं.रा.स) 3.373 | प्रलंबित तसलमात रकमेबाबत |
| | | | | | 10 (पं.रा.स) 3.374 | भुजल सर्वेक्षणासाठी ब्लास्टिंग वाहने लावणेसाठी व कार्यशाळेसाठी जागा भाडयाने घेतलेबाबत |
| | | | | | 11 (पं.रा.स) 3.826 | प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची थकीत पाणीपट्टीबाबत |
| | | | | | 13 (पं.रा.स) | येडेमाच्छिंद्र ता. वाळवा नळ पाणी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 3.375 | पुरवठा योजनेवरील खर्चाबाबत |
| | | | | | 17 (पं.रा.स) 3.376 | शेडशाळ नळ पाणी पुरवठा योजनेवरील खर्चाबाबत |
| | | | | | 19 (पं.रा.स) 3.377 | पलुस नळ पाणी पुरवठा योजनेवरील खर्चाबाबत |
| 19 | 2018-19 | 5, 8, 18, 19, 21, 25, 27, 29, | 1, 2, 3, 4, 6, 7, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 20, 22, 23, 24, 26, 28, 30, | 30 | | |
| 20 | 2019-20 | 3, 4, 5, 10, 13, 17, 18, 24, 25, 26, | 1, 2, 6, 7, 8, 9, 11, 12, 14, 15, 16, 19, 20, 21, 22, 23, | 26 | | |
| 21 | 2020-21 | 2,4,9,13,14, 17,18,19,20, 22 | 1,3,5,6,7,8,10, 11,12,15,16,21, | 22 | | |
| | | | एकूण | 645 | | |

उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाचे पुढील अभिप्रायामध्ये नमुद करणेत आलेले परिच्छेद क्रमांकच अंतिम समजणेत यावेत .

# Part II

## *ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद*

## भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ, ब, क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## 1 अंदाजपत्रक कमी जादा खर्चाबाबत.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली सन 2021-2022 चे लेखापरिक्षणात अंदाजपत्रक कमी जादा खर्चाबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

| लेखाशिर्ष | अखर्चित अनुदान | 21-22मध्ये अनुदान | एकूण | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| 22159941 मुख्यमंत्री ग्रामीण | 8880157 | 60000000 | 68880157 | 41261588 | 27618569 |
| 34511812नाविन्यपूर्ण योजना | 0 | 2896552 | 2896552 | 2525050 | 371502 |
| 34512488पर्यटन स्थळ मुलभूत | 5000000 | 00 | 5000000 | 3273979 | 1726021 |
| 2225E49zwj;2 विशेष घटक योजना | 2145000 | 00 | 2145000 | 305000 | 1840000 |
| 22450093पाणी टंचाई | 0 | 10140000 | 10140000 | 9987359 | 152641 |
| 45510011डोंगरी विकास कार्यक्रम | 338 | 968586 | 0 | 189662 | 968586 |
| 450012आमदार फंड | 1945056 | 4373000 | 6318056 | 2051358 | 4266698 |
| 28100221/31अपारंपारीक उर्जा विकास आभिकरण | 0 | 15466967 | 15466967 | 0 | 15466967 |
| एकूण | 17970551 | 93845105 | 110846732 | 59593996 | 52410984 |

1)महाराष्ट्र शासन अर्थसंकल्प नियम पुस्तिका खंड 1 नियम 37 नुसार अंदाजपत्रक तयार करताना अंदाजपत्रकातील(प्रत्येक बाबीसाठी)वस्तुनिष्ठ अंदाज असणे बंधनकारक आहे. म्हणजेच त्या बाबीमध्ये अंतर्भुत असलेली

योजना व तिचा वाव प्रत्यक्षात हाती असलेला कालावधी व त्यानुसार आवश्यक तेवढीच तरतूद करणे याबाबीचा समावेश होतो. कोणत्याही बाबीखालील प्रस्तावीत तरतूद खर्च करण्यायोग्य नसलेने शिल्लक राहणार नाही याची खबरदारी अंदाजपत्रक तयार करतानाच घेतली गेली पाहिजे.परंतु ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने तसे केले नाही तरतूद असुन देखील खर्च केलेला नाही.

2)मुंबई वित्तीय नियम 1959 नियम 57 नुसार एखाद्या निधीतील रक्कम त्वरीत देणे आवश्यक असल्याशिवाय कोषागारातून काढु नये असे निर्देश आहेत. काम चालू ठेवणेस किंवा पुर्ण होण्यास पुष्कळसा कालावधी असेल किंवा मंजूर रक्कम व्यपगत होणार म्हणून कोषागारातून आगावू रक्कम काढण्यास परवानगी नाही तथापि योजनेकडील प्राप्त अनुदान,खर्च व शिल्लक अनुदान पाहता रुपये 52410984/- इतकी मोठया प्रमाणात सन 2021-2022 मध्ये शिल्लक अनुदान आहे .

3)विशेष घटक योजना या लेखाशिर्षाखालील सन 2020-2021 मधील शिल्लक अखर्चित अनुदान रुपये 2145000/- इतके असुन सन 2021-2022 मध्ये प्राप्त अनुदान रुपये 00/- त्यापैकी रुपये 305000/- इतके खर्च झाले आहे तरी रक्कम रुपये 1840000/-इतकी शिल्लक अनुदान असून त्यापैकी सन 2020-2021 मधील शिल्लक अनुदान त्वरीत शासन निधीस भरणा करावी.

4) अपारंपारीक उर्जा विकास आभिकरण या लेखाशिर्षाखाली सन 2021-2022 मध्ये रक्कम रुपये 15466967/- इतके अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु सन 2021-2022 मध्ये खर्च झालेला नाही तरी सन 2022-2023 मध्ये सदर शिल्लक अनुदान खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

5)आमदार फंड या लेखाशिर्षाखालील सन 2020-2021 मधील शिल्लक अखर्चित अनुदान रुपये 1945056/-इतके असुन सन 2021-2022 मध्ये अनुदान रुपये 4373000/- त्यापैकी रुपये 2051358/- इतके खर्च झाले आहे तरी रक्कम रुपये 4266698/-इतकी शिल्लक अनुदान असून त्यापैकी सन 2020-2021 मधील शिल्लक अनुदान त्वरीत शासन निधीस भरणा करावी.

6) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल या लेखाशिर्षा खालील सन 2020-2021 मधील शिल्लक अखर्चित अनुदान रुपये 8880157/-इतके असुन सन 2021-2022मध्ये अनुदान रुपये 60000000/- त्यापैकी रुपये 41261588/- इतके खर्च झाले आहे तरी रक्कम रुपये 27618569/-इतकी शिल्लक अनुदान असून त्यापैकी सन 2020-2021 मधील शिल्लक अनुदान त्वरीत शासन निधीस भरणा करावी.

7)पर्यटन स्थ्ळ या लेखाशिर्षाखालील सन 2020-2021 मधील शिल्लक अखर्चित अनुदान रुपये 5000000/-इतके असुन सन 2021-2022 मध्ये अनुदान रुपये 00/- त्यापैकी रुपये 3273979/- इतके खर्च झाले आहे तरी रक्कम रुपये 1726021/-इतकी शिल्लक अनुदान असून त्यापैकी सन 2020-2021 मधील शिल्लक अनुदान त्वरीत शासन निधीस भरणा करावी.

ZPEVBKM7601 (Ref No : 10, Hmm No : 12)

## 2 शासकीय अनुदान निर्धारणाबाबत.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9अ | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परीषद सांगली कडील प्राप्त शासकीय अनुदान निर्धारण नस्तीची तपासणी

करता खालील लेखाशिर्षाखाली प्राप्त व खर्च शासकीय अनुदानाचे अनुदान निर्धारण करुन घेणेत आलेले नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अनुदान निर्धारण न झालेला कालावधी |
|---|---|---|
| 1. | 2215 योजना व आस्थापना | 2000-2001 ते 2021-2022 |

उपरोक्त लेखाशिर्ष कालावधीचे अनुदान निर्धारणाचे काम प्रदिर्घ कालावधीपासून प्रलंबित आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे.

1.सन 2021-2022 या आर्थिक वर्षात सन 2000-2001 ते सन 2021-2022 या आर्थिक वर्षांचे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अनुदान निर्धारण करणे आवश्यक होते तथापि सन 2021-2022 या आर्थिक वर्षात अनुदान निर्धारण केल्याचे आढळून आले नाही.

2.शासन ग्रामविकास परिपत्रक क्र.एमआयएस/1079/सीआर-303/ब/30, दि.29/10/1980 व शासन पत्र ग्रामविकास विभाग बीयुडी/1082/2450/सीआर/57/ब-30, दि.21/08/1981 यातील सूचनेनुसार ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद सांगलीकडील 2000-2001 ते 2021-2022 या वित्तीय वर्षांचे पुणे विभागीय आयुक्त कार्यालय पुणे विभाग, पुणे यांचेकडून अनुदान निर्धारण करून घेण्यात आलेले नाही.

3.महाराष्ट्र शासन विभाग परिपत्रक क्रं. जिपनि/2000/2157/27 दिनांक 12/5/2000 नुसार नियमितपणे प्रत्येक वर्षी अनुदान निर्धारण होणे आवश्यक आहे. अनुदान निर्धारण वेळेत न झाल्याने शासन व जिल्हा परिषदेस येणे देणे रकमा अनेक वर्षे निश्चित न झाल्यामुळे मोठया प्रमाणावर रकमा गुंतुन पडतात. तरी अनुदान निर्धारण त्वरीत करण्यात येवून सदर कालावधीतील येणे देणे रकमा निश्चित करुन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन पुर्तता दर्शवावी.

4.मुंबई वित्तीय नियमावली 1959 च्या परिशिष्ट 22 प्रमाणे स्थानिक संस्थांना दिलेल्या शासकीय अनुदानाचे निर्धारण करणे आवश्यक आहे. जिल्हा परीषदांनी कोणत्याही वित्तीय वर्षाचे लेखे पुढील वर्षाच्या 30 जुन पर्यंत पुर्ण केल्यानंतर 31 ऑगस्ट पर्यंत या लेख्यांचे निरीक्षण उतारे संबंधित शासकीय विभाग प्रमुखाकडे पाठवुन संबंधित शासकीय विभागास व ग्राम विकास विभागास कळवायचे असतात. अनुदान निर्धारणासाठी वार्षिक लेखे संबंधित विभागाकडे पाठविण्याची नियत मुदत 31 ऑगस्ट आहे. त्यावेळी निर्धारणाची वाट न पाहता जिल्हा परिषदेच्या खातेप्रमुखांनी मंजूर अनुदानापेक्षा कमी किंवा जादा खर्चाची प्रकरणे संयुक्तीक व सुस्पष्ट खुलाशासह विभाग प्रमुखाकडे सादर करणे अपेक्षित असते व विभाग प्रमुखांनी अनुदानाचे निर्धारण 31 डिसेंबर पर्यंत पुर्ण करावयाचे असते तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. उपरोक्त कालावधीचे अनुदान निर्धारणाचे काम ब-याच कालावधीपासून प्रलंबित आहे.

5.ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जि.प.सांगली यांनी याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडे अनुदान निर्धारणाचा प्रस्ताव सादर करुन अनुदान निर्धारण करुन घेण्यात येऊन सर्व अखर्चित रकमा व अंतिम अमान्य रकमा शासन सदरी भरणा करणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATMEMM9101 (Ref No : 3, Hmm No : 16)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## 3 प्रलंबित तसलमात रकमेबाबत.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | जिल्हा परिषद स्व-निधी व शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 111664.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली यांचेकडील तसलमात नोंदवहीची पडताळणी केली असता मागील तसलमात रकमांचे समायोजन झाले नसल्याचे दिसून येते.

| अ.क्रं. | सन | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| 1 | 2005-2006 | 12014 | मिरज/वाळवा/पलुस/पुरस्थिती (यांत्रिकी विभाग) |
| 2 | 2006-2007 | 99650 | विटा/मिरज/वाळवा (यांत्रिकी) |
| | एकूण | 111664 | |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियमान्वये संबंधित तसलमात रकमांचे समायोजनाकरिता विभागाने योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

1) महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग निर्णय क्रं. प्रसंस/झेपीए/042/प्रक्र/1376/33 दिनांक 10/6/1992 मध्ये सुचित केल्याप्रमाणे थकीत रकमांचे समायोजन न झाल्यास तसलमात रक्कम मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याकडुन रक्कम वसुल करणेबाबत निर्देश आहेत. तसेच शासन निर्णय क्रं. पंरास/ईपीओ/5/870/33 दिनांक 11/1/1990 नुसार अग्रीम रकमांचे समायोजन वर्षअखेरीस करणे बंधनकारक आहे असे असताना विभागाकडे सन 2021-2022 अखेर रकमा प्रलंबित आहेत.

2.महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग निर्णय क्रं. प्रसंस/झेपीए/042/प्रक्र/1376/33 दिनांक 10/6/1992 मध्ये सुचित केल्याप्रमाणे थकीत रकमांचे समायोजन न झाल्यास तसलमात रक्कम मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याकडुन व्याजासह वसुलात आणण्याची कार्यवाही करावी.

3.महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रं.झेडपीए/2009/प्रक्र 522/वित्त 9 मुंबई 32 दिनांक 10/12/2010 नुसार तसलमात रकमाबाबत योग्यती कार्यवाही करुन ज्या आर्थिक वर्षातील तसलमात असेल त्याच आर्थिक वर्षात ती वसुल करणे अथवा वेतनातून समायोजन करणे आवश्यक असतांना वरील तसलमातीच्या रकमा वसुल करण्यात आलेल्या नाहीत ही बाब गंभीर आहे.

DATMEMM9101 (Ref No : 5, Hmm No : 18)

## 4 मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे आरळा ताशिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 79539.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली सन 2021-2022 चे लेखापरिक्षणात मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे आरळा ता.शिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे बाबतचे नस्ती तपासणी केली असता त्याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| कामाचे नांव | मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे आरळा ता.शिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे |
| निधीचे नांव | मुख्यमंत्री पेयजल योजना |
| अंदाजपत्रकीय रककम | रुपये 13139315/- |
| निविदा स्विकृत व रक्कम | 16.25 जादा दराने रुपये 15158203/- |
| प्रशासकीय मान्यता | सुधारीत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा सांगली दि. 31/3/2022 |
| तांत्रिक मान्यता | सुधारीत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा सांगली दि. 24/3/2022 |
| मक्तेदाराचे नांव | सहयाद्री कन्टक्शन |
| काम सुरु दिनांक | 7/03/2019 |
| काम पुर्ण दिनांक | 28/07/2021 |
| कामाची मुदत | 18 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रं. | 5109/ 1 ते 73 |
| कामावरील एकूण खर्च | रुपये 14978723/- |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| 01 | 13/08/2018 | 2004386 | पहिले धावते |
| 01 | 25/03/2021 | 4858734 | दुसरे धावते |
| 01 | 17/11/2021 | 3523356 | तिसरे धावते |
| 04 | 31/3/2022 | 4592265 | चौथे व अंतिम |

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक 27/09/2018 अन्वये सदर कामाची ई निविदा प्रक्रिया राबविणे आवश्य़क असताना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) सदर कामाच्या 1 ते 4 धावत्या देयकातून आयकर रुपये 293575/- कपात केलेला आहे. भारतीय आयकर कलम 1961 चे कमम 194सी अन्वये मक्तेदार फर्म असलेने 2 टक्के आयकर रुपये 299575/- कपात करणे आवश्यक होते. आयकराची कमी कपात रक्कम रुपये 6000/-वसुली होवून शासकीय कोषागारात भरणा करणेत यावा.

3) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 मधील कलम 51व शासन निर्णय वित्त विभाग दि. 28.09.2018 मधील मुद्दा क्र. 4 व 5 अन्वये वार्षिक खरेदी मूल्य रुपये 250000 च्या पुढे जात असेल तर पुरवठादाराच्या देयकातून TDS 2% TDS रक्कम रु 299575/- वसुल करणे आवश्यक असताना 1 ते 4 धावत्या देयकातून रक्कम रुपये 293575/- वसुल केलेली आहे कमी रक्कम रुपये 6000/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन चलने पुर्तता सादर करावी.

4) गौण खनिजसाठी महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 11/5/2015 पासुन रुपये 141.34 प्रति घमी प्रमाणे रुपये 267567/- रॉयल्टी वसुल करणे आवश्यक असताना 1 ते 4 धावत्या देयकातून रक्कम रुपये 197272/- वसुल केलेली आहे कमी रक्कम रुपये 67539 /- वसुल करुन शासन खाती भरणा करुन चलने पुर्तता सादर करावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 114,118,120 व 152 (3) व बी1 टेंडर फॉर्म मधील कलम 38(1) तरतूदीनुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतूद असताना खालीलप्रमाणे जादा काम करण्यात आले आहे.

| अ.क्रं | तपशील | अंदाजपत्रकीय तरतूद | प्रत्यक्ष झालेले काम | परिमाणात 25 टक्के जादा काम करण्याची | जादा परिमाण | दर | वाढीव खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing constration coffer | 1125 | 1601.5 | 1406.25 | 195.3 | 521.40 | 101829 |
| 2 | Lobour Section Exavation | 414 | 703.40 | 517.5 | 185.9 | 415.8 | 77297 |
| | एकूण | | | | | | 179126 |

6) तसेच खालील बाबींच्या परिमाणात बचत ही 10 टक्के पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधिल नियम क्र.118 व 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. त्यामुळे बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली हे स्पष्ट करण्यात यावे.

| बाब | तपशिल | तरतुद परिमाण | प्रत्यक्ष काम झालेली | दर | बचत रक्कम |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | बचत | | |
| Providing Fixing | 2.76 | 1.45 | 1.32 | 57413 | 75628 |
| Providing Dry trap | 109.97 | 0 | 109.97 | 1003.2 | 110321 |
| | | | | | 185949 |

7) साहित्याचा चाचणी अहवाल शासकीय तंत्र निकेतन/ आभियांत्रिकी महाविदयालयाचा आवश्यक असताना खाजगी महाविदयालय बुधगाव यांचेकडून घेतलेला आहे.

8) जॅकवेलचे आरसीसी कॉक्रीट क्युब व स्वीच रुम आरसीसी चे तपासणी अहवाल शासकीय तंत्र निकेतन/ आभियांत्रिकी महाविदयालयाचा आवश्यक असताना सदर चाचणी अहवाल जि.प सांगली बांधकाम विभाग गुणवत्ता परीक्षण यांचेकडून घेतलेला आहे.

9) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक : ग्रापापू-1098/प्रक्र245/पापु-07 दिनांक 11 जानेवारी 1999 मधील सूचना क्रमांक 10 (अ) अनुसार नळ योजनेच्या जागेवर योग्य त्या ठिकाणी कामाचा तपशील निर्देशिनारा फलक लावण्यात येऊन सदरील बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलकाची तरतूद केलेली नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस1099/प्र.क्र.54/08 दिनांक 20 मे 99 अन्वये कामाच्या ठिकाणी परिच्छेद ब प्रमाणे फलकावर संपूर्ण माहिती लिहून लावण्याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश असताना विभागाने शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही न करता बोर्ड लावलेला नाही.

उपरोक्त उप परि.क्रं.1 ते 9 मधील आक्षेपांची पूतर्ता होईपर्यंत रक्कम रुपये 79539/- अंतिम अमान्य व रुपये 14899184 /- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

IRMSVNM7601 (Ref No : 11, Hmm No : 5)

## 5 प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची थकीत पाणीपट्टीबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 124577566.00/- |
| **निधी** | : | जिल्हा परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली सन 2021-2022 चे लेखापरिक्षणात प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची थकीत पाणीपट्टीबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद सांगली कडे 11 नळ पाणी पुरवठा योजना हस्तांतर आहेत.या योजनेमध्ये 114 गावे समाविष्ठ आहेत सोबत जोडलेल्या पाणीपट्टी वसुली पत्रकाचे अवलोकन करता लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची पाणीपट्टी वसुली पत्रक सादर केले आहे. सदर पत्रक पहाता 1 ते 11 योजनेची सन 2021-2022 मध्ये एकूण मागणी रुपये 158228801/- पैकी रक्कम रुपये 33651235/- इतकी पाणीपट्टी वसुली झाली आहे व थकबाकी रुपये 124577566/- इतकी आहे.

2) पाणीपट्टी वसुली ही ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर असल्याने 100 टक्के वसुलीबाबत ठोस उपाय योजना करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

3) प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना मणेराजुरी, कवठेमहंकाळ/विसापुर,,येळावी,रायगाव, या येजना वीज बीलाअभावी मार्च 2017पासुन बंद असलेचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. शासनाने सदर योजना कार्यान्वीत होण्यासाठी मोठया प्रमाणावर शासन अनुदान खर्च केलेला आहे तरी सदरच्या योजना बंद असल्यामुळे शासनाचा हेतु सफल झाल्याचे दिसून येते नाही. नळ पाणी पुरवठा योजनेची गरज लक्षात घेता योजनेवरील सर्व समाविष्ठ गावाना विश्वासात घेऊन धोरणात्मक निर्णय घेऊन योजना कार्यान्वीत करणेची दक्षता घ्यावी.

4) पाणीपट्टी वसुली कमी झाली असल्याने त्याचा देखभाल दुरुस्तीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सन 2021-22 चे सोबत जोडलेल्या पाणीपट्टी वसुली पत्रकाचे अवलोकन केले असता सन 2021-22 मध्ये 100 टक्यापेक्षा जादा वसुली केलेली दिसुन येत आहे सदर वसुली खुप चांगली केलेली आहे.

उपरोक्त उप परि.क्रं.1 ते 5 मधील आक्षेपांची पूतर्ता होईपर्यंत रक्कम रुपये 124577566/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

IRMSVNM7601 (Ref No : 13, Hmm No : 3)

## 6 मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत म्हैसाळ तामिरज येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 200080.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली सन 2021-2022 चे लेखापरिक्षणात मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत म्हैसाळ ता.मिरज येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे बाबतचे नस्ती तपासणी केली असता त्याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| कामाचे नांव | मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत म्हैसाळ ता.मिरज येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे |
| निधीचे नांव | मुख्यमंत्री पेयजल योजना |
| अंदाजपत्रकीय रककम | रुपये 14999015/- |
| निविदा स्विकृत व रक्कम | 0.99 कमी दराने रुपये 14850524/- |
| प्रशासकीय मान्यता | मा.मु कार्यकारी आधिकारी जि.प. सांगली दि. 11/5/2017 |
| तांत्रिक मान्यता | कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा सांगली दि. 15/10/2016 |
| मक्तेदाराचे नांव | पदमावती कन्टक्शन |

| | |
|---|---|
| काम सुरु दिनांक | 16/03/2018 |
| काम पुर्ण दिनांक | 31/03/2019 |
| कामाची मुदत | 18 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रं. | - |
| कामावरील एकूण खर्च | रुपये 13695357/- |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| 04 | 27/03/2018 | 3083638 | पहिले धावते |
| 01 | 1/03/2019 | 9918020 | दुसरे धावते |
| 02 | 4/08/2021 | 693699 | तिसरे व अंतिम |

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) शासन निर्णय सार्व बांधकाम विभाग दिनांक 27/09/2018 अन्वये सदर कामाची ई निविदा प्रक्रिया शासन निर्णयाप्रमाणे राबविणे आवश्य़क असताना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) महाराष्ट्र मुद्रांक व नोंदणी शुल्क विभागाकडील राजपत्र दि. 24 एप्रिल 2015 चे नुसार रक्कम रु.15000 च्या मुद्रांकावर करार करून घेणे आवश्यक असताना रु.14000 च्या मुद्रांकावर करार करून घेतलेला आहे, तरी मुद्रांक रक्कम रु.1000 ठेकेदाराकडून वसूल करून मुद्रांक खात्यास भरणा करावी.

3) सदर कामाचा मक्तेदार पदमावती कन्टक्शन ही फर्म आहे. 1 ते 3 धावत्या देयकातून 1टक्का आयकर रुपये 136500/- कपात केली आहे. भारतीय आयकर कलम 1961 चे कमम194सी अन्वये मक्तेदार फर्म असलेने 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक होते.आयकराची कमी कपात रक्कम रुपये 137407/-वसुली होवून शासकीय कोषागारात भरणा करणेत यावा.

4) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 मधील कलम 51व शासन निर्णय वित्त विभाग दि. 28.09.2018 मधील मुद्दा क्र. 4 व 5 अन्वये वार्षिक खरेदी मूल्य रुपये 250000 च्या पुढे जात असेल तर पुरवठादाराच्या देयकातून TDS 2% TDS रक्कम रु 273907/- वसुल करणे आवश्यक असताना 1 ते 3 धावत्या देयकातून रक्कम रुपये 212234/- वसुल केलेली आहे कमी रक्कम रुपये 61673/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन चलने पुर्तता सादर करावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 114,118,120 व 152 (3) व बी1 टेंडर फॉर्म मधील कलम 38(1) तरतूदीनुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतूद असताना खालीलप्रमाणे जादा काम करण्यात आले आहे.

| अ.क्रं | तपशील | अंदाजपत्रकीय तरतूद | प्रत्यक्ष झालेले काम | परिमाणात 25 टक्के जादा | जादा परिमाण | दर | वाढीव खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | काम करण्याची | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Exavation Foundation | 248.65 | 402.22 | 310.81 | 91.4075 | 780.03 | 70980 |
| 2 | Providing rubble masonry | 17.53 | 43.41 | 21.91 | 21.49 | 2814.3 | 60479 |
| | एकूण | | | | | | 131459 |

6) तसेच खालील बाबींच्या परिमाणात बचत ही 10 टक्के पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधिल नियम क्र.118 व 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. त्यामुळे बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली हे स्पष्ट करण्यात यावे.

| बाब | तपशिल | तरतुद परिमाण | प्रत्यक्ष काम | झालेली बचत | दर | बचत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | Hard Murum | 518.40 | 228 | 290 | 187.25 | 54377 |
| | Coupler 160mm | 192 | 12 | 180 | 1334 | 240120 |
| | | | | | | 294497 |

7) पाण्याची टाकीची जागा ग्रामपंचायत म्हेसाळ यांची मालकीची असलेबाबत सातबारा उतारा नस्ती सोबत आढळून आलेला नाही

8) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक : ग्रापापू-1098/प्रक्र245/पापु-07 दिनांक 11 जानेवारी 1999 मधील सूचना क्रमांक 10 (अ) अनुसार नळ योजनेच्या जागेवर योग्य त्या ठिकाणी कामाचा तपशील निर्देशिनारा फलक लावण्यात येऊन सदरील बाबींचा अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असताना अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलकाची तरतूद केलेली नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएस1099/प्र.क्र.54/08 दिनांक 20 मे 99 अन्वये कामाच्या ठिकाणी परिच्छेद ब प्रमाणे फलकावर संपूर्ण माहिती लिहून लावण्याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश असताना विभागाने शासन निर्देशाप्रमाणे कार्यवाही न करता बोर्ड लावलेला नाही.

9) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रासयो/2008/प्र.क्र.75/यो-9 दिनांक 29/05/2008 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता मधील नियम 87 नुसार जिल्हा परिषदेमधील सर्व योजनांतर्गत कामांवरील साहित्याच्या चाचण्या ह्या शासकीय प्रयोगशाळेमार्फत घेणे आवश्यक आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.सदर संचीकेस जोडण्यात आलेला चाचणी अहवाल हा खाजगी प्रयोगशाळेकडून चाचणी केल्याबाबतचा आहे. त्यामुळे कामासाठी वापरलेले साहित्य योग्य दर्जाचे असल्याबाबत खात्री करता आली नाही.

उपरोक्त उप परि.क्रं.1 ते 9 मधील आक्षेपांची पूतर्ता होईपर्यंत रक्कम रुपये 200080/- अंतिम अमान्य व रक्कम रुपये 13495277/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

IRMSVNM7601 (Ref No : 14, Hmm No : 6)

## 7 हातपंप,विद्युतपंप देखभाल व दुरुस्ती वर्गणी थकबाकीबाबत

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 12315000.00/- |
| **निधी** | : | जिल्हा परिषद स्व- निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 0.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली सन 2021-2022 चे लेखापरिक्षणात हातपंप,विद्युतपंप देखभाल व दुरुस्ती वर्गणी थकबाकीबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील हातपंप,विदयुतपंप वर्गणी रुपये 12315000/-इतकी रक्कम थकीत आहे.याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) जिल्हा परिषद पाणी पुरवठयाच्या सोयीसाठी पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये बोअरिंग करुन त्यावर हातपंप व विद्‌यूतपंप बसवितात व नंतर सदर योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करुन पाणी पुरवठा केला जातो.परंतु पंपामध्ये बिघाड झाल्यास त्याची दुरुस्ती व देखभाल जिल्हा परिषद करते. शासन निर्णय दिनांक 11 सप्टेबर 1981 नुसार हातपंप देखभाल दुरुस्तीसाठीची वर्गणी तसेच ग्राम विकास विभागाकडील पत्र दिनांक 31 जुलै 1981 नुसार विद्‌युतपंपाची देखभाल व दुरुस्तीसाठीची वर्गणी ग्रामपंचायत यांचेकडून वसुल करुन ग्रामीण पाणी पुरवठा निधीमध्ये जमा करावयाची असते.

2) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे वर्गणीसाठी हातपंप 9545 व वीजपंप 692 पात्र आहेत. सन 2021-2022अखेर हातपंप व वीजपंप वर्गणी रुपये 12315000/- इतकी थकबाकी आहे. सदर थकबाकीची रक्कम मोठया प्रमाणावर थकीत आहे. वर्गणी वसुलीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. हातपंप/वीजपंप वर्गणी वसुलीबाबत महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक देप्रोअ/1309/प्रक्र 69/पापु 07 दिनांक 29/9/2009 नुसार हातपंप/ वीजपंप वर्गणी ग्रामपंचायतीने भरली नसल्यास जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीना देय असणाऱ्या शासकीय अनुदानातून थेट कपात करावे असे स्पष्ट आदेश आहेत तरी जिल्हा परिषदेने याबाबत नियमानुसार कार्यवाही करुन पुर्तता करावी.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग दिनांक 31/3/1978 च्या शासन आदेशानुसार त्रिस्तरीय योजनेअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्याचे वेतन व भत्ते तसेच सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्याची प्राथमिक जबाबदारी जिल्हा परिषदेची असल्या मुळे जिल्हा परिषदेने हातपंप/विद्‌युतपंप देखभाल व दुरुस्ती निधी वसुलीच्या कामाला प्राधान्य देवून जास्तीत जास्त थकबाकी वसुल करुन दाखवावी.

4) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने जिल्हा परिषद अंतर्गत 10 तालुक्याकडील हातपंप/वीजपंप बाबत ग्रामपंचायती सोबत करारनामे करुन घेवून नियमानुसार कार्यवाही करावी व पुर्तता लेखापरिक्षणास सादर करावी.

IRMSVNM7601 (Ref No : 15, Hmm No : 1)

## 8 आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत साखराळे ता वाळवा पाईपलाईन व टाकी बांधणे

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : | 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : | शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 6476.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली सन 2021-2022 चे लेखापरिक्षणात आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत साखराळे ता. वाळवा पाईपलाईन व टाकी बांधणे बाबतचे नस्ती तपासणी केली असता त्याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| कामाचे नांव | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत साखराळे ता. वाळवा पाईपलाईन व टाकी बांधणे |
| निधीचे नांव | आमदार स्थानिक विकास कार्यक्रम |
| अंदाजपत्रकीय रककम | रुपये 1137560/- |
| निविदा स्विकृत व रक्कम | अंदाजपत्रकीय दराने रुपये 1137560/- |
| प्रशासकीय मान्यता | मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील क्रं. 2988 दिनांक 26/9/2016 |
| तांत्रिक मान्यता | |
| मक्तेदाराचे नांव | सतीश सुर्यवंशी |
| काम सुरु दिनांक | 18/07/2017 |
| काम पुर्ण दिनांक | 14/06/2019 |
| कामाची मुदत | 6 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रं. | |
| कामावरील एकूण खर्च | रुपये 1099000/- |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| 1 | 27/05/2021 | 1099000 | पहिले व अंतिम |

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) शासन निर्णय सार्व बांधकाम विभाग दिनांक 27.09 2018 अन्वये सदर कामाची ई निविदा प्रक्रिया शासन निर्णयाप्रमाणे राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) तसेच वन व महसूल विभागकडील शासन अधिसूचना दि. 01/09/2016 नुसार एकूण वसूल रु.9807/- गौण खनिज शुल्काचे 10% रु.981/- गौण खनिज स्वामित्व शुल्क जिल्हा खनिकर्म निधी मध्ये जमा करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही झालेली नाही.

3) उपसंचालक,विमा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,यांचे परिपत्रक क्र.प्रविनि-2310/सा.बा.वि/विमावसूली /अभि-3,दि.08/09/2010नुसार 1% कामगार विमा रक्कम देयकातून कपात करणे आवश्यक असताना कमी कपात विम्याची रक्कम रु.5495/- वसुलात आणावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 114,118,120 व 152 (3) व बी1 टेंडर फॉर्म मधील कलम 38(1) तरतूदीनुसार कामाच्या परिमाणाच्या 25 टक्के किंवा रुपये 5000/- पर्यंतचे जादा काम करण्याची तरतूद असताना खालीलप्रमाणे जादा काम करण्यात आले आहे.

| अ.क्रं | तपशील | अंदाजपत्रकीय तरतूद | प्रत्यक्ष झालेले काम | परिमाणात 25 टक्के जादा काम करण्याची | जादा परिमाण | दर | वाढीव खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Pipe 100mm Dia | 17 | 23 | 21.25 | 1.7 | 1490 | 2608 |
| 2 | Pipe 100mm Dia | 2 | 8 | 2.5 | 5.5 | 365.95 | 2013 |
| | एकूण | | | | | | 4621 |

5) तसेच खालील बाबींच्या परिमाणात बचत ही 10 टक्के पेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधिल नियम क्र.118 व 152(3) नुसार कामातील बचत ही अन्य बाबीच्या कामावरील खर्च करणेकरीता वापरणे अनियमिततेचे आहे. त्यामुळे बचत कोणत्या प्राधिकारान्वये वापरण्यात आली हे स्पष्ट करण्यात यावे.

| बाब | तपशिल | तरतुद परिमाण | प्रत्यक्ष काम | झालेली बचत | दर | बचत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | 125mm Dia | 12 | 0 | 12 | 1941 | 23292 |
| | Exvation for foundation | 356.2 | 266.58 | 89.67 | 187.25 | 16790 |
| | | | | | | 40082 |

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/1099/प्रक्र54 दि.20 मे 1999 नुसार माहिती फलक लावणे अनिवार्य असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

7) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक ग्रासयो/2008/प्र.क्र.75/यो-9 दिनांक 29/05/2008 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता मधील नियम 87 नुसार जिल्हा परिषदेमधील सर्व योजनांतर्गत कामांवरील साहित्याच्या चाचण्या ह्या शासकीय प्रयोगशाळेमार्फत घेणे आवश्यक आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त उप परि.क्रं.1 ते 7 मधील आक्षेपांची पूतर्ता होईपर्यंत रक्कम रुपये 6476/- अंतिम अमान्य व रक्कम रुपये 1092524 /- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

IRMSVNM7601 (Ref No : 16, Hmm No : 4)

## 9 मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे रिळे ताशिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **योजना** | : 00 | **लेखाशीर्ष** | : | 00 | **वसुलपात्र** | : | 0.00/- |
| **निधी** | : शासन निधी | **कलम** | : | 9ब | **अंतिम अमान्य** | : | 51533.00/- |

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद सांगली सन 2021-2022 चे लेखापरिक्षणात मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे रिळे ता.शिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे बाबतचे नस्ती तपासणी केली असता त्याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| कामाचे नांव | मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत मौजे रिळे ता.शिराळा येथे नळ पाणीपुरवठा योजना करणे |
| निधीचे नांव | मुख्यमंत्री पेयजल योजना |
| अंदाजपत्रकीय रककम | रुपये 7716397/- |
| निविदा स्विकृत व रक्कम | अंदाजपत्रकीय दराने रुपये 7716397/- |
| प्रशासकीय मान्यता | मु.कार्यकारी आधिकारी जि.प.सांगली1747 दि. 3/8/2017 |
| तांत्रिक मान्यता | कार्यकारीअभियंता ग्रामीण पाणी पुरवठा सांगली1521दि. 8/7/2017 |
| मक्तेदाराचे नांव | अरुण माने |
| काम सुरु दिनांक | 6/01/2018 |
| काम पुर्ण दिनांक | |
| कामाची मुदत | 18 महिने |
| मोजमाप नोंदवही क्रं. | 1253/ 1 ते100 7268/1 ते 99 |
| कामावरील एकूण खर्च | रुपये 7714205/- |

| प्र.क्र. | दिनांक | रक्क्म | तपशील |
|---|---|---|---|
| 01 | 26/03/2018 | 2118584 | पहिले धावते |
| 01 | 27/07/2018 | 498585 | दुसरे धावते |
| 03 | 30/10/2018 | 1436585 | तिसरे धावते |
| 02 | 31/5/2019 | 1535174 | चौथे धावते |
| 02 | 26/2/2021 | 1127184 | पाचवे धावते |

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | 4/8/2021 | 998093 | सहावे व अंतिम |
| | एकूण | 7714205 | |

याबाबत लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे

1) शासन निर्णय सार्व बांधकाम विभाग दिनांक 27/09/2018 अन्वये सदर कामाची ई निविदा प्रक्रिया शासन निर्णयाप्रमाणे राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम 2017 मधील कलम 51व शासन निर्णय वित्त विभाग दि. 28.09.2018 मधील मुद्दा क्र. 4 व 5 अन्वये वार्षिक खरेदी मूल्य रुपये 250000 च्या पुढे जात असेल तर पुरवठादाराच्या देयकातून TDS 2% TDS रक्कम रु 152576/- वसुल करणे आवश्यक असताना 1 ते 6 धावत्या देयकातून रक्कम रुपये 101942/- वसुल केलेला आहे कमी रक्कम रुपये 50633/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन चलने पुर्तता सादर करावी.

